**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट ब (मुख्य) परीक्षा- २०१८**
**(सहायक कक्ष अधिकारी)**

**अंतिम निकालाची घोषणा**

**जाहिरात क्र. ३५/२०१८**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे **दिनांक २६ ऑगस्ट, २०१८** व **दिनांक २७ ऑक्टोबर, २०१८** रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट ब (मुख्य) परीक्षा- २०१८ (सहायक कक्ष अधिकारी)** या पदाच्या **एकूण १२६** जागांचा निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षेमध्ये रायगड या जिल्हयातील श्री. कराळे रोहन अर्जुन, बैठक क्रमांक PN 003322 हे राज्यातून व मागासवर्गवारीतून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून बीड या जिल्हयातील श्रीमती मिसाळ प्रियंका भास्कर , बैठक क्रमांक PN003079 हया राज्यात प्रथम आल्या आहेत.

**३.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks ) व तपशीलवार गुणवत्तायादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**४.** अर्जात प्राविण्य प्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित) पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या दिनांक २० मार्च, २०१८ रोजी किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपुर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक राहील. सदर क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल शासन स्तरावरुन तपासूनच संबंधित उमेदवाराच्या विषयांकित पदावरील नियुक्तीबाबतची कार्यवाही शासनातर्फे करण्यात येईल.

**५.** प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईल मध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक **३.८** पहावे)

दिनांक : १९ मार्च, २०१९
ठिकाण : मुंबई

**उपसचिव (परीक्षा-१)**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग